# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 15 February 2025
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – १५ फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- बेकायदा धर्मांतर आणि लव्ह जिहाद विरोधातल्या नव्या कायद्याच्या तरतुदींचा अभ्यास करण्यासाठी सात सदस्यीय समिती स्थापन
- सीबीएसईच्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांना आजपासून शांततेत सुरुवात
- ४४ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाला छत्रपती संभाजीनगर इथं आजपासून प्रारंभ

आणि

- मराठा आरक्षणासंदर्भात मागण्या मान्य करण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्याकडून शासनाला पंधरा दिवसांची मुदत

****

बेकायदा धर्मांतर आणि लव्ह जिहाद विरोधातल्या नव्या कायद्याच्या कायदेशीर तरतुदींचा अभ्यास करण्यासाठी राज्यसरकारने पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन केली आहे. या समितीत महिला आणि बालकल्याण विभाग, अल्पसंख्याक व्यवहार विभाग, विधी आणि न्याय विभाग, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग या विभागांचे सचिव तसंच गृह विभागाच्या उपसचिवांचा समावेश आहे.

ही समिती बळजबरीनं केलं जाणारं धर्मांतर आणि लव्ह जिहाद विषयी राज्यातल्या सद्यस्थितीचा अभ्यास करेल, आणि यासंदर्भातल्या तक्रारींवरील कार्यवाहीसाठीच्या उपाययोजना सुचवणार आहे. इतर राज्यांमधल्या यासंदर्भातल्या कायद्यांचा ही समिती अभ्यास करणार आहे.

****

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसईच्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांना आजपासून प्रारंभ झाला. देशातल्या ७ हजार ८४२, तर परदेशातल्या २६ केंद्रांवर या परीक्षा होत आहेत. यंदा दहावीच्या परीक्षांसाठी २४ लाख १२ हजारापेक्षा जास्त तर बारावीच्या परीक्षांसाठी १७ लाख ८८ हजारापेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. दहावीच्या परीक्षा १८ मार्च, तर बारावीच्या परीक्षा ४ एप्रिल रोजी संपणार आहेत.

दरम्यान, विद्यार्थ्यांना परीक्षांमुळे येणाऱ्या तणावाच्या व्यवस्थापनात मदत करण्यासाठी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं समुपदेशन सेवाही सुरू केली आहे. सोमवार ते शनिवार सकाळी साडेनऊ ते संध्याकाळी साडेपाच या वेळात ही सेवा उपलब्ध असेल.

****

जगभरातील युवा नेत्यांच्या सुसंवादातून जगासमोरील सामायिक आव्हानांवर उपाय शोधता येतील, असं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम अंतर्गत फोरम ऑफ यंग ग्लोबल लिडर्सच्या ५० युवा सदस्यांनी आज मुंबईत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची सदिच्छा भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. युवकांनी संपत्ती निर्माण करावी मात्र अर्जित संपत्तीचा समाजासाठी वापर करावा, असं आवाहन राज्यपालांनी केलं. यावेळी युवा उद्योजक अमेय प्रभू, गौरव मेहता यांच्यासह ४० देशातील नेते उपस्थित होते.

****

कोकणाचा कॅलिफोर्निया करण्याऐवजी, कॅलिफोर्नियाला कोकणासारखं व्हावंसं वाटेल, असं का करण्याचं आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. ते आज रत्नागिरी इथं पक्षाच्या आभार सभेत बोलत होते. विधानसभा निवडणुकीमध्ये शिवसेनेला मिळालेल्या विजयामध्ये कोकणी माणसाचा वाटा मोठा आहे, या विजयाने विरोधकांची बोलती बंद केली, अशी भावनाही शिंदे यांनी व्यक्त केली.

****

पर्यटकांना जगभर फिरवून आणणारे केसरी टुर्सचे संचालक केसरी पाटील यांचं आज सकाळी मुंबईत वार्धक्यानं निधन झालं. ते ९० वर्षांचे होते. आज संध्याकाळी त्यांच्या पार्थिवावर शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. पर्यटन व्यवसायातले रोजगार आणि व्यवसाय तसंच व्यवस्थापन संधीची माहिती देऊन अनेकांना या क्षेत्रात येण्याची प्रेरणा देण्यात ते मार्गदर्शकाची भूमिका बजावत

असत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी केसरी पाटील यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

****

संत सेवालाल महाराजांचा २८६वा जन्मसोहळा आज सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वाशिम जिल्ह्यातल्या पोहरादेवी इथं आठवडाभरापासून श्रीमद् भागवत सप्ताह, ग्रंथ लिलामृत कथा, कलश पालखी सोहळा, शोभायात्रा मिरवणुक, भजन, कीर्तन आदीसह विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.

****

संत सेवालाल महाराज यांच्या २८६व्या जयंतीनिमित्त हिंगोली इथं आज आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिर घेण्यात आलं. यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.

छत्रपती संभाजीनगर इथंही विविध संस्था संघटनांच्या वतीनं सेवालाल महाराजांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

****

४४व्या मराठवाडा साहित्य संमेलनाला आजपासून प्रारंभ झाला. छत्रपती संभाजीनगर जवळ वाळूज इथल्या दगडोजीराव देशमुख महाविद्यालयात उभारलेल्या विलासराव देशमुख साहित्य नगरीतून निघालेल्या ग्रंथदिंडीने संमेलनाला प्रारंभ झाला. मसिआचे अधक्ष चेतन राऊत यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना अभिवादन करून ग्रंथदिंडीचे उद्घाटन करण्यात आलं. या ग्रंथदिंडीत लेझीम पथक, लाठी काठी पथक, भजनी मंडळ सहभागी झालं होतं. लाठी काठी फिरवण्याचं प्रात्यक्षिक तसंच भारूड आणि देशभक्तीपर गीतं सादर करून या कलाकारांनी नागरिकांचं लक्ष वेधून घेतलं.

त्यानंतर मुख्य मंडपात संमेलनाध्यक्ष डॉ भीमराव वाघचौरे यांच्या हस्ते संमेलनाचं उद्घाटन झालं. पालकमंत्री संजय शिरसाट, मसापचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील, स्वागताध्यक्ष विजय राऊत, यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. उद्यापर्यंत चालणाऱ्या या संमेलनात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आजपासूनचं नियोजित साखळी उपोषण पुढे ढकललं आहे. शासनाने आपल्या चार मागण्यांपैकी दोन मागण्यांबाबत निर्णय घेतला आहे, उर्वरित दोन मागण्यांबाबत निर्णय घेण्यासाठी शासनाला पंधरा दिवसाचा वेळ देत असल्याचं मनोज जरांगे पाटील यांनी सांगितलं. मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय न झाल्यास पुन्हा उपोषण करण्याचा इशारा जरांगे यांनी दिला आहे.

****

छत्रपती संभाजीनगर शहरातल्या शिवाजीनगर भुयारी बोगद्याचं पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते आज लोकार्पण करण्यात आलं. यावेळी मंत्री अतुल सावे तसंच खासदार संदिपान भुमरे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. हा भुयारी मार्ग सुरू झाल्यामुळे शहरातील नागरिकांना आता दिलासा मिळणार आहे. दोन वर्षापासून बीड बायपास वर होणारी वाहतूक कोंडी आणि अपघाताची मालिका देखील आता थांबेल, अशी अपेक्षा मराठवाडा रेल्वे कृती समितीचे अध्यक्ष अनंत बोरकर यांनी व्यक्त केली.

****

महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना देशभरातील ऊर्जा कंपन्यांमधून सर्वोत्कृष्ट अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक म्हणून गौरवण्यात आलं आहे. गव्हर्नन्स नाऊ या प्रतिष्ठित नियतकालिकाच्यावतीनं काल मुंबईत घेतलेल्या 'वेस्टेक सिम्पोसियम अँड अ‍ॅवॉर्ड २०२५' सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

****

धाराशिव जिल्ह्यात लोहारा तालुक्यातील धानुरी इथं महाराष्ट्र जीवनोन्नती अभियान अर्थात–उमेद अभियानाच्या सहकार्यातून अंबिका महिला बचत गटाने गो–संवर्धनातून आत्मनिर्भरतेकडे वाटचाल केली आहे. या बचतगटाने गोमूत्र आणि शेणांच्या गोवऱ्यापासून दंतमंजन करण्याचा व्यवसाय सुरु केला आहे. याशिवाय पंचगव्यापासून अमृतधारा नावाचं गुणकारी तेल, पंचगव्य बाम, पंचगव्य साबण यासारखी उत्पादनं तयार केली आहेत. बचत गटाच्या महिलांनी याबाबत अधिक माहिती दिली –

***नमस्कार. माझे नाव पुष्पावती लक्ष्मण बाबर. मी दंत्तमंजन घेतलेलं आहे. आणि सेंद्रीय खताची शेती केलेली आहे. गोमुत्र आम्ही फवारणीसाठी वापर करतो. म्हणून आमचं पीकपाणी, उत्पन्न वाढतंय.***

***नमस्कार. माझे नाव वैशाली साळुंखे. मी धानोरीमध्ये २०२० पासून सी आर पी म्हणून काम करत आहे. यांना आम्ही प्रोत्साहन केले की त्यांच्याकडे देशी गाई आहेत. त्यांनी म्हणले प्रॉडक्ट आम्ही बनवू शकतो, पण प्रॉडक्ट बनवण्यासाठी पैसा नाही. मग आम्ही अंतर्गत कर्ज दिलं. बँकेचं कर्ज मिळवून दिलंय. ग्रामसंघातून, सी आय एफच्या माध्यमातून त्यांना प्रोत्साहन केलं की तुम्ही प्रॉडक्ट तयार करा.***

****

हिंगोली शहरात छत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती पुतळा परिसरात आज शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने शिवकालीन आणि ऐतिहासिक नाण्यांचं प्रदर्शनाचे उदघाटन भरवण्यात आलं. या प्रदर्शनात देशविदेशातील नाणी, नोटांचं प्रदर्शन आणि त्यांचा इतिहास मांडण्यात आला. शहरातील युवक वैभव कोटकर यांनी दहा वर्षापासून या नाण्यांचं आणि नोटांचं संकलन केलं आहे.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूर इथं पोलिसांनी एमडी हा अमंलीपदार्थ विक्री करणाऱ्या तीन जणांना अटक केली. या कारवाईत पोलिसांनी अंमलीपदार्थांनच्या ५९ पुड्या जप्त केल्या असून, त्याची किंमत अडीच लक्ष रुपये आहे. या कारवाईत पोलिसांनी एक वाहन, मोबाईल यासह एकून दहा लाख ७५ हजार रुपये किमतीचा मद्देमाल जप्त केला आहे.

****

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेस नुकतंच एक वर्ष पूर्ण झालं. या योजनेचा महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील साडेनऊ हजारांहून अधिक ग्राहकांनी लाभ घेतला आहे, अशी माहीती छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांनी दिली आहे. छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून घरगुती वीजग्राहकांना एक किलोवॅटसाठी ३० हजार रुपये, दोन

किलोवॅटसाठी ६० हजार रुपये आणि तीन किलोवॅट आणि त्यापेक्षा जास्त क्षमतेसाठी कमाल ७८ हजार रुपये अनुदान दिलं जातं.

****

छत्रपती संभाजीनगर इथं मालमत्ता धारकांकडून थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी महापालिकेकडून सातत्याने प्रभावीपणे मोहीम राबवण्यात येत आहे.

****